


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २९५ वा ❑ शनिवार दि.२४ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनाने पुणे जगभरात पोहोचले-चंद्रकांत (दादा) पाटील

## बजाज पुणे ग्रँड टूर- २०२६'चा यशस्वी समारोप

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : 'बजाज पुणे ग्रँड टूर-२०२६' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकल स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाने पुण्याचे नाव जगात पोहोचले. प्रशासनाने गेले सहा महिने या स्पर्धे साठी खूप मेहनत व तयारी केली, अशा शब्दात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी स्पर्धेच्या समारोपप्रसंगी प्रशासनाचे कौतुक केले.

'बजाज पुणे ग्रँड टूर- २०२६' च्या अंतिम टप्प्यासह स्पर्धेच्या यशस्वी समारोप आज बालगंधर्व रंगमंदीर समोर झाला. त्यानंतर झालेल्या पारितोषिक वितरण समारंभाला केंद्रीय युवक कार्य व क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे, खासदार मेधा कुलकर्णी, युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलच्या (युसीआय) महासंचालक अमीना लानाया, युसीआयचे उपाध्यक्ष व आशियाई सायकलिंग महासंघाचे (एसीसी) अध्यक्ष दातो अमरजीत सिंग गिल, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे (सीएफआय) महासचिव मनिंदर पाल सिंग, अभिनेता अमीर खान, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, बजाज ऑटोचे व्यवस्थापकीय




संचालक राजीव बजाज, पंचशील रियाल्टीचे चेअरमन अतुल चोरडिया, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्याकडून जिल्हाधिकाऱ्यांचे विशेष कौतुक

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेचे चांगले नियोजन झाले. या स्पर्धेच्या यशाचे श्रेय कुणाला जात असेल तर ते श्री. डूडी यांना जाते अशा शब्दात त्यांनी विशेष कौतुक केले. पुणेकरांनी इतका मोठा खेळ उपक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान दिले. पुढील वर्षीही खूप मोठा इव्हेंट आयोजित केला जाईल, असेही ते म्हणाले. राज्यमंत्री श्रीमती खडसे सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देऊन म्हणाल्या, भारत हे आता खेळांसाठी एक चांगले ठिकाण झाले आहे. आपले राष्ट्र खेळसंस्कृतीकडे वाटचाल करत आहे याचा जास्त आनंद आहे. यावेळी युसीआयच्या महासंचालक श्रीमती लानाया यांनी स्पर्धेचे अत्यंत यशस्वी आयोजन झाल्याचे सांगून स्पर्धेला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असे सांगितले. येथे सायकलिंगला चालना मिळेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी श्री. गिल तसेच अभिनेता अमीर खान यांनीही स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. श्री. बजाज, श्री. चोरडिया यांनीही मनोगत व्यक्त केले.

चौथ्या टप्प्यात सायकलस्वारांनी शहराच्या मध्यभागातून ९५ किलोमीटरचा प्रवास केला. ५७८ मीटरची चढण पार करून ही शर्यत पुण्याच्या अनेक ऐतिहासिक रस्त्यांवरून शनिवारवाड्यासारख्या आणि वास्तूंच्या जवळून गेली. चार टप्प्यात सायकलस्वारांनी एकूण ४३७किलोमीटर अंतर पार केले. यात ली निंग स्टार संघाने २८ तास ४१ मिनिटे १९ सेकंद अशा एकत्रित वेळेसह संघ क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले. ल्यूक मुडग्वे याच्या सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर चीनच्या या संघाने सर्व चार टप्प्यांवर आपले वर्चस्व राखले. स्पेनचा बर्गोस बर्पेललेट बीएच संघ (२८ तास ४२ मिनिटे ०९ से.) दुसऱ्या, तर मलेशियाचा तेरेंगानू सायकलिंग संघ (२८ तास ४८ मिनिटे १९ से.) तिसऱ्या स्थानावर राहिला. शुक्रवारी चौथ्या टप्प्यात ली निंग स्टार संघाच्या अलिक्सेईने बाजी मारली. त्याचा सहकारी कॅमेरून निकोलस स्कॉट याने दुसऱ्या क्रमांकावर शर्यत पूर्ण केली, तर रूजाई इन्शुरन्स विनस्पीड संघाच्या डायलन हॉपकिन्स याने तिसरे स्थान मिळवले.

## विशेष लेख...

### बालविवाह एक गंभीर संकट

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

बालविवाह हे एक गंभीर संकट आहे जे मुलांच्या हक्कांचे उल्लंघन करते आणि त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य नष्ट करते, त्यांना हिंसाचार, शोषण आणि गरिबीच्या दुष्टचक्रात अडकवते; ही एक गुंतागुंतीची समस्या आहे जी गरिबी, सामाजिक नियम आणि मानवतावादी संकटांशी जोडलेली आहे, ज्याला रोखण्यासाठी कायदेशीर तरतुदी आणि सामाजिक जागरूकता तसेच बहु-क्षेत्रीय प्रयत्नांची आवश्यकता आहे, जेणेकरून प्रत्येक मुलाला सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्य मिळेल.

कायदा असूनही बालविवाह होतात. कारण गरिबी, अशिक्षण, सामाजिक रूढी, स्त्रियांचा कमी दर्जा आणि जनजागृतीचा अभाव यांसारख्या खोलवर रुजलेल्या सामाजिक-आर्थिक कारणांमुळे कायद्याची अंमलबजावणी करणे कठीण जाते, ज्यामुळे कायद्यातील तरतुदी असूनही बालविवाह मोठ्या प्रमाणात घडतात. बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ नुसार मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण नसणे हा गुन्हा आहे, तरीही अनेक ठिकाणी (विशेषतः ग्रामीण भागात) असे विवाह होतात, ज्यामुळे मुलींचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्यावर गंभीर परिणाम होतो.

महाराष्ट्रील हिंगोली जिल्यातील वसमत येथील

एका गावच्या जिल्हा परिषद शाळेत इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या पंधरा वर्षीय विद्यार्थिनीचे लग्न तिच्या पालकांनी निश्चित केले होते मुलगी अल्पवयीन असताना आणि तिची शिकण्याची जिद्द असतानाही कुटुंबीयांनी तिच्या मनाविरुद्ध हे लग्न लावून देण्याचा घाट घातला होता मात्र या अन्यायाविरुद्ध गप्प न बसता त्या मुलीने धाडस दाखवले आणि शाळेच्या मुख्याध्यापकांना गाठून आपली कैफियत मांडली थेट मुख्याध्यापकांकडे लेखी विनंती केल्याने प्रशासकीय यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. ग्रामीण भागात बालविवाह सारख्या प्रथमविरुद्ध बोलण्यास मुलीत धजावत नाहीत मात्र या १५ वर्षीय मुलीने समाजाची आणि घरच्यांची परवा न करता स्वतःचे भविष्य वाचवण्यासाठी ही जे पाऊल उचलले त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे शिक्षण हा माझा हक्क आहे हा संदेश तिने आपल्या कृतीतून दिला आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार १८ वर्षाखालील मुलींचे लग्न लावणे हा गुन्हा आहे मात्र ग्रामीण भागातील अनेक पालक आपल्या मुलींचे लग्न अठरा वर्षाच्या आतच लावून देतात गरिबी, बेकारी, आर्थिक ऐपत नसणे, मुलींची सुरक्षितता मुलींच्या शिक्षणाच्या सोयीचा अभाव ,रूढ असलेल्या प्रथा या कारणांमुळे आजही मोठ्या प्रमाणावर बालविवाह होतात.पालकांना व मुलांना बालविवाहाचे दुष्परिणाम व महत्व पटवून देणे गरजेचे आहे.विशेष म्हणजे पालकांचे समुपदेशन करणे आवश्यक आहे.

प्रतिबंधक कायदा असूनही महाराष्ट्रासह देशात मोठ्या प्रमाणात बालविवाह होतात ही दुर्दैवाची बाब आहे. परंतु केवळ कायदा करून समाज बदलत नाही. कायद्याच्या पळवाटा काढून लोक बालविवाह संपन्न करतात. बालविवाह होत आहे अशी गुप्त माहिती जर गावच्या पोलिसांना, ग्रामसेवकाला,बालविवाह प्रतिबंध अधिकारी, इतर सक्षम सरकारी यंत्रणांना प्राप्त झाल्यास त्वरित लग्नाच्या विधीचे रूपांतर साखरपुड्यात केले जाते. दिल्लीच्या एका न्यायालयीन निवाड्यात अल्पवयीन मुलीचा साखरपुडा करणे हे बेकायदा नाही असे ठरवले आहे. गुन्हेगारांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यास हा कायदा अत्यंत सक्षम आहे कारण तो दखलपात्र व अजामीनपात्र आहे. आरोप सिद्ध झाल्यास दोन वर्षाची शिक्षा तसेच एक लाखापर्यंत दंड आकारण्याची तरतूद आहे.

सरकारने बालविवाह प्रतिबंध कायदा करण्याबरोबरच अल्पवयीन मुलींसाठी मोफत शिक्षण, आरोग्य, कल्याणकारी योजना अशा अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत. हे सर्व मुलींचे भविष्य चांगले घडावे म्हणून केलेले आहे. असे असूनही मुलींचे पालक ज्ञातीच्या, समाजाच्या दबावाला बळी पडून, कालबाह्य चालीरीती व परंपरा याचा पुरस्कार करतात व अल्पवयातच मुलींना बोहल्यावर उभे करतात.

बालविवाहाची कारणे अशी आहेत – १) चुकीच्या श्रद्धा, धार्मिक परंपरा २) बालविवाहाच्या दुष्परिणामांविषयीचे असलेले अज्ञान ३) शिक्षणाचा अभाव ४)गरीबी ५) पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये असलेले स्त्रियांचे दुय्यम स्थान. ६) आई-वडील शेतीला गेल्यानंतर तरुण मुलीला एकटे घरात ठेवण्याचे भय. ७) मुलीचा जन्म केवळ चूल आणि मूल याच्यासाठी असणे असा गैरसमज.

कोविडच्या कालावधीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात बालविवाह झाले. तसेच अक्षय तृतीयेच्या दिवशी सुद्धा खूप मोठ्या प्रमाणामध्ये लहान मुलींची लग्ने लावली जातात. प्रशासकीय यंत्रणा, सेवाभावी संस्था जागृत राहून लहान मुलींची लग्ने होऊ नयेत यासाठी प्रयत्नशील असतात.पण अजूनही खूप काम करावे लागेल. जागृती करावी लागेल. मुलींची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी ठोस पावले उचलावी लागतील. कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करावी लागेल.

२००६ रोजी केंद्राने बालविवाह प्रतिबंधक कायदा केला. तो भारतातील सर्व राज्यांना लागू होतो. काही दिवसापूर्वी आसाम सरकारला या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली पाहिजे, असे का वाटले याचा आपल्या सर्वांना विचार करण्यासारखी गोष्ट आहे. गेल्या काही दिवसांतच हजारो नागरिकांना पकडून पोलिसांनी तुरुंगात टाकले आहे. हे सर्व नागरिक त्या मुलींचे पालक आई-वडील, नातलग, लग्न लावून देणारे धर्मगुरू आहेत. त्यांना जामीन मिळू नये म्हणून त्यांच्याविरुद्ध बालविवाह कायद्याव्यतिरिक्त भारतीय दंड विधान कायद्याअंतर्गत (आयपीसी ३७६) बलात्कार व लहान मुलांवर केलेले लैंगिक अत्याचार (पॉक्सो) अशी खूप भयानक कलमे लावलेली आहेत. ज्यामध्ये किमान सात वर्षे तुरुंगवास ते जन्मठेपेची तरतूद आहे. पण यातून खरंच काही साध्य होणार आहे का?

बालविवाहाचे परिणाम गंभीर असून त्यात शिक्षण थांबणे, आरोग्य धोक्यात येणे (लवकर गर्भधारणा, लैंगिक आजार), मानसिक ताण, हिंसाचार आणि गरिबीचे दुष्टचक्र सुरू राहणे यांचा समावेश होतो, ज्यामुळे मुलींचे भविष्य आणि त्यांच्या मुलांचे आरोग्यही धोक्यात येते.

आरोग्यावर परिणाम होतात.

लवकर गर्भधारणा होते. शारीरिक आणि मानसिक तयारी नसताना लवकर गर्भधारणा होते, ज्यामुळे माता आणि बाळाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो.लैंगिक आणि प्रजनन आरोग्याबद्दल माहिती नसल्याने एचआयव्ही/एड्स आणि इतर लैंगिक आजार होण्याचा धोका वाढतो.

गरोदरपणात आणि बाळंतपणात गंभीर गुंतागुंत (उदा. ऑब्स्टेट्रिक फिस्टुला) निर्माण होऊ शकते, ज्यामुळे मातामृत्यूचा धोका वाढतो.नैराश्य, आत्महत्येचे विचार आणि मानसिक तणाव वाढतो. शालेय शिक्षण अर्धवट सुटते, ज्यामुळे भविष्यातील संधी मर्यादित होतात. शिक्षण आणि कौशल्यांच्या अभावामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे कठीण होते आणि गरिबीचे चक्र सुरू राहते. शारीरिक, लैंगिक आणि भावनिक हिंसाचाराला बळी पडण्याचा धोका वाढतो.

अधिकार आणि निर्णयक्षमता कमी होते. स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता कमी होते आणि त्यांना आवाज मिळत नाही.

सामाजिक एकाकीपणा: मित्र-मैत्रिणींपासून दूर राहिल्याने एकाकीपणा येतो आणि स्वातंत्र्यावर गदा येते.

बालविवाहामुळे जन्माला येणाऱ्या मुलांमध्ये अकाली जन्म, कमी वजन आणि बालमृत्यूचा धोका वाढतो. बालविवाहामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणातही अडथळे येतात.

बालविवाह ही एक मानवी हक्कांची पायमल्ली असून, हे थांबवण्यासाठी शिक्षण आणि जागरूकता वाढवणे आवश्यक आहे.

# पुरणपोळीच्या ओढीपासून रामायणाच्या पूर्णत्वापर्यंत गुरुकृपेने घडलेला : गावबा

ज्योतिर्मय साहित्य

पैठणमध्ये राहणं माझ्या आयुष्यात नकळत घडलेला एक महत्त्वाचा टप्पा ठरला. तेव्हा हे लक्षात नव्हतं. काम, जबाबदाऱ्या, रोजची धावपळ. या सगळ्यात दिवस जात होते. पण संध्याकाळी किंवा कधी निवांत वेळ मिळाला की पाय आपोआप संत एकनाथ महाराजांच्या समाधी मंदिराकडे वळायचे.

त्या परिसरात एक वेगळीच शांतता आहे. फार बोलकी नाही, फार गाजावाजाची नाही. जणू काही ती जागा माणसाला हळूहळू ऐकायला शिकवते. बाहेरचं नव्हे, आतलं.

समाधी मंदिराच्या अगदी लागूनच एक साधी, लहानशी समाधी आहे. गावबांची. सुरुवातीला मीही इतरांसारखाच तिथून नुसताच पुढे गेलो. पण वर्षानुवर्षं त्या जागी येत राहिल्यावर जाणवत गेलं की, ही समाधी केवळ एखाद्या व्यक्तीची नाही; ती एका विलक्षण जीवनदृष्टीची खूण आहे.

गावबा. मुळचा वारूळचा. साधा, अडाणी, अनेकांच्या दृष्टीने वेडसर. कुणी त्याला संत मानलं नाही, कुणी विद्वान मानलं नाही. नाथ महाराजांच्या प्रवचनाला तो यायचा, असं सांगितलं जातं, तेही कुठल्या मोठ्या आध्यात्मिक जिज्ञासेने नव्हे, तर फक्त प्रसादाच्या ओढीने. पोटाची भूक होती, शब्दांची नव्हे. त्यांना पुरणपुडा या नावानेही ओळखले जात असे, कारण त्यांना जेवणात पुरणपोळी अत्यंत प्रिय होती. गावबा ह्यांना संत एकनाथ महाराजांच्या साहित्यात काही ठिकाणी नित्यानंद असेही म्हटले जाते, गावबा यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.



पण तो आला आणि गेला नाही. प्रवचन समजलं की नाही, याचा त्याला फारसा फरक पडत नव्हता. शब्द कळले नाहीत तरी तो बसायचा. नाथ महाराज बोलत असताना त्याच्या मनात काय चालायचं, हे कुणालाच ठाऊक नाही. पण तो नित्य येत राहिला. दिवस, महिने, वर्षं, सहवास तुटला नाही.

हळूहळू नाथ महाराजांच्या शब्दांचा ठसा त्याच्या मनावर उमटू लागला. तो स्वतःला ज्ञानी समजू लागला नाही. 'मला कळतं' असंही तो कधी म्हणाला नाही. पण गुरूच्या कृपेने जे घडत गेलं, ते घडत गेलं. अगदी शांतपणे.

नाथ महाराजांचा अखेरचा ग्रंथ. भावार्थ रामायण. त्याचा उत्तरार्ध पूर्ण करण्याची आज्ञा नाथांनी गावबांना दिली.

ही गोष्ट ऐकताना आजही थक्क व्हायला होतं. ज्याला समाजाने फारसं गांभीर्याने घेतलं नाही, ज्याच्याकडे कुठलीही विद्वत्तेची ओळख नव्हती, त्याच्याकडून हजारो ओव्यांचं रामायण उतरून घेतलं गेलं.

गावबांनी ते लिहिलंपण कुठेही स्वतःचं नाव पुढे केलं नाही. कर्तेपणा नाही, अहंकार नाही. गावबा यांनी भावार्थ रामायणाचा उर्वरित भाग पूर्ण करताना एकनाथांच्याच शैलीचा आणि एका जनार्दनी या नाममुद्रेचा वापर केला, जेणेकरून ग्रंथात एकवाक्यता राहील. उत्तरकांड पूर्ण करताना त्यांनी स्वतःचा कर्तेपणा पुढे न आणता, गुरूंचाच भाव, शैली आणि नाममुद्रा जपली. ही गोष्ट त्यांच्या आध्यात्मिक प्रगल्भतेचे द्योतक आहे. ग्रंथ पूर्ण झाला, पण लेखक मागेच राहिला. आजही भावार्थ रामायण वाचताना गावबा डोळ्यांसमोर फारसा येत नाही. आणि कदाचित हीच त्याची खरी उंची आहे.

मी त्या समाधीसमोर उभा राहिलो आहे. काही वेळा निवांत, काही वेळा अस्वस्थ मनाने. तिथे उभं राहिल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत राहिली. साधना म्हणजे मोठे शब्द नाहीत, मोठे संकल्प नाहीत. साधना म्हणजे थांबणं. निघून न जाणं.

वारूळसारख्या साध्या गावातून आलेला हा माणूस, पैठणसारख्या संतभूमीत गुरूजवळ टिकून राहिला. आणि त्या टिकून राहण्यातून जे घडलं, ते ग्रंथरूप झालं.

''सद्गुरुची कृपा घडे,
तै पांगुळा पर्वत चढे.''

ही ओळ इथे केवळ म्हण बनून राहत नाही; ती अनुभवासारखी उभी राहते.

आज मागे वळून पाहताना जाणवतं, तो काळ फक्त नोकरीनिमित्त पैठणमध्ये घालवलेला काळ नव्हता. तो काळ न बोलता शिकवणारा होता. नाथ महाराजांची समाधी, गावबांची साधी स्मृती, आणि वारूळपासून पैठणपर्यंत आलेला हा जीवनप्रवास. या सगळ्यांनी मिळून एक गोष्ट मनात पक्की केली. उपदेश शब्दांत नसतो. तो एखाद्या साध्या समाधीसमोर उभं राहिल्यावर, हळूच मनात उतरतो.

***






## जात्यावरच्या ओव्या......

वाटा तिळगुळ
म्हणा गोड गोड बोला
हसा खुदुखुदु
यंदा सोडा अबोला ||४६४||

तिळगुळाची कोंद
केली कुटून कुटून
थोडी ठेवली घराला
दिली समदी वाटून ||४६५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे...



उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय 📖 साहित्य

रेडिओवर तुकोबांचा अभंग लागला होता. लताबाई गात होत्या. त्या गाण्याच्या तालावर श्यामरावांनी ठेका धरला होता. तेही गुणगुणू लागले होते, वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे... एवढ्यात राजेशने त्यांची तंद्री भंग केली.. बाबा, ऐका ना मी काय म्हणतोय ते...? श्यामराव आपल्या तंद्रीतून बाहेर येत म्हणाले, हं, बोला राजे. राजेश म्हणाला, बाबा, हा संत तुकाराम महाराजांचा अभंग आहे ना ? श्यामराव राजेशच्या ज्ञानावर खुश होत म्हणाले, अगदी बरोबर. बेटा, तुला आवडला का हा अभंग ? लता मंगेशकरांनी फार सुंदर गायला आहे बरं. अहो बाबा, अभंग तर सुदंर आहेच. पण मला विचारायचे ते वेगळेच आहे. बोल बोल काय विचारायचे आहे तुला ? बाबा म्हणाले.. राजेश म्हणाला, बाबा, आता जसे शाळेत पर्यावरणाचे महत्व शिकवतात. झाडे लावा वगैरे सांगतात. तसे तुकाराम महाराजांच्या काळी पण सांगत असावेत का हो ? हा प्रश्न ऐकल्याबरोबर बाबांना हसू फुटले. तशी पिंकी मध्ये येत म्हणाली, बाबा, हा राजेश ना काय विचारेल काही सांगता येत नाही..



नाही नाही पिंके, अग आपल्या राजेशला पडलेला प्रश्न बरोबरच आहे. या प्रश्नाचे उत्तर मी सांगतो. पण त्याआधी तू एक काम कर. तू आईला आपल्या सगळ्यांसाठी मस्त गरमागरम पोहे करायला सांग. आणि पोहे झाले की तिला पण इकडे ये म्हणावं.

हो बाबा, आता सांगते आईला असं म्हणत पिंकी स्वयंपाकघराकडे पळाली. ती गेली तशी परतलीही.

राजेश म्हणाला, आता सांगा ना बाबा माझ्या प्रश्नाचे उत्तर.

हो सांगतो. त्याचं काय आहे राजेश, त्या वेळी आजच्यासारख्या शाळा वगैरे नव्हत्या. गुरुजी किंवा पंतोजी घरी येऊन शिकवायचे. काही ठिकाणी गुरुकुलासारखी पद्धतही होती. पण वृक्षांचे, पर्यावरणाचे महत्व वेगळे सांगावे लागत नव्हते. कारण त्याची जाण त्या काळातील लोकांना म्हणजेच आपल्या पूर्वजांना मुळातच होती. ते स्वतःच पर्यावरणाला जपायचे, त्याची काळजी घ्यायचे. त्याचे संस्कार आपोआपच त्या काळातील लहान मुलांवर व्हायचे. वृक्षांना पवित्र मानून त्यांची पूजा केली जायची. कामापुरतीच विशिष्ट झाडे तोडली जायची. जंगले शाबूत होती, घनदाट होती. त्यावर लोकांची उपजीविका चालायची. आणि तुकाराम महाराजांसारखे संत तर वनातच राहायचे. तिथेच त्यांची उपासना, ध्यान, जपतप इ. गोष्टी व्हायच्या. त्या वनातील वृक्ष, प्राणी हेच त्यांचे सखेसोबती असायचे. त्यांच्या संगतीत त्यांचा वनवासही सुखकर व्हायचा. आणि दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या साधूसंतांना मुळातच पर्यावरणाची जाण होती, त्याचे महत्व कळले होते. समर्थ रामदासांच्या दासबोधात सुद्धा कितीतरी ठिकाणी वेगवेगळ्या कारणाने वृक्षांचा उल्लेख त्यांनी केला आहे. बाबांनी सोप्या शब्दात सांगण्याचा प्रयत्न केला.

(क्रमशः)






दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## द्वैतकल्पनानिरसन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

(दशक ७ समास ५)

नमस्कार

द्वैत आणि अद्वेत, माया आणि ज्ञान, व्रुती आणि प्रव्रुत्ती मनाची झालेली उन्मन अवस्था या सगळ्या अतिशय चिंतनशील अवस्था आहेत मी एक सामान्य संत साहित्याची अगदीच प्राथमिक अवस्थेतील विद्यार्थी आहे दासबोध समजायला हे आयुष्य कमी पडेल अशा प्रकारचा ग्रंथराज दासबोध आहे तुम्ही जेवढा विचार कराल तेवढी तुमची प्रतिभा जाग्रुत होत जाते आणि अजुन किती लिहू आणि किती नको असे वाटायला लागते.


तर मित्रांनो माया ही मनाची आई आहे. मायेचे मुळ कल्पना आहे. म्हणून मानवी मन देखील कल्पनामय असते. आपल्या घरात जसे आई,आजी यांची सत्ता चालते तशीच सत्ता कल्पनेच्या साम्राज्यात मायेची चालते. माया ही एक कल्पनेच्या पुढची पायरी आहे. आपण आपल्या स्वतः वर माया करावी कुटूंबावर, पतीपत्नी, भाऊऊभाऊ, भाऊबहिण, मित्रमंडळी सर्व नातेसंबधातील व्यक्ती, समाज, आजूबाजूच्या परिसरातील मानवी अवस्थेतील जीवनमूल्ये, नैतिकता, सात्विकता याशिवाय राज्य देश जग अशा चढत्या क्रमाने मायेचे स्थित्यंतर अनुभवता येते. देहबुद्धीच्या मनाला द्रुष्य खरे वाटते पण शुध्द तर्काने विचार केलातर अशाश्वत म्हणून तेच द्रुष्य खोटे वाटते. मग द्रुष्य मायामय तर शुध्द ब्रम्ह शाश्वतपणे मायेच्या पलीकडे अशी कल्पना करून मन खुणेने दोघांचेही अस्तित्व मान्य करते.पण एक गोष्ट याठिकाणी लक्षात घ्यायला हवी की ब्रम्ह कल्पनारहित आहे हे सत्य ज्ञानी पुरूष जाणतात.

१५ वी ओवी म्हणजे संपूर्ण समासाचे सार आहे असे मला वाटते ते कसे ते पहा बरका!

शुध्द ब्रम्ह मन व बुद्धी यांच्या आटोक्याबाहेरचे आहे. ते कल्पनेच्या पलीकडे आहे. कल्पना तेथे पोहचू शकत नाही त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला पाहिजे असा अनुभव घेतल्यानंतर समजते की द्वेत शिल्लकच नाही. द्वेताचें भान जोपर्यंत असते तोपर्यंतच ब्रम्हाचा अनुभव येत नाही. उलट ब्रम्हाचा अनुभव आला की द्वैत शिल्लकच उरत नाही.

म्हणून समर्थ म्हणतात द्वेत व अद्वैत या कल्पना आहेत त्या मनाला भासतात. (क्रमशः)

## मनुष्यमात्र भगवंताच्या प्राप्तीसाठीच जन्माला आला आहे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय 📖 साहित्य

भगवंत एकच ओळखतो : जो त्याची भक्ती करतो, तो त्याला आवडतो. तिथे जातीचे, वर्णाचे बंधन नाही. आपण भाग्यवान कुणाला म्हणतो ? ज्याच्याजवळ पैसा अधिक असतो त्याला; पण तो काही खरा भाग्यवान नव्हे. ज्याला भगवंत भेटला तो खरा भाग्यवान. भगवंत आपल्याला भेटणे हे प्रत्येकाने जीवनातले मुख्य कार्य समजावे. पैसा भगवंताच्या आड येत नसतो; आपला अहंकार, मीपणा, हाच मुख्यत: भगवंताच्या आड येतो. ‘ मी सेवा करतो ’ असे जो म्हणतो त्याची खरी सेवाच होत नाही. कर्तेपणा आपल्याकडे घेतो तोपर्यंत सेवा नाही घडली. भगवंताची आठवण ठेवून जे जे कर्म आपण करतो ते ते पुण्यकर्म होते. भगवंत माझ्याजवळच आहे अशी श्रद्धा ठेवून वागा. श्रद्धेने जो करील त्याला फळ येईल खास. पण म्हणून श्रद्धेवांचून केलेले भजनपूजन वाया जाते असे नाही समजू. भगवंताची भक्ती उत्पन्न व्हावी म्हणूनच भजनपूजन करावे, मनाचे रंजन म्हणून करू नये. सत्कर्म करणारे पुष्कळ असतात, पण पुष्कळ वेळा त्यात स्वार्थबुद्धी असते. फळाची आशा न ठेवता सत्कर्म करणे हीच खरी भक्ती.

सर्वांभूती भगवद्भाव ठेवावा हेच परमार्थाचे खरे सार आहे. माझ्यामध्ये भगवंत आहे हे मी ओळखले म्हणजे इतरांच्या ठिकाणी त्याला पाहता येईल. ‘ मी कोण ’ हे न ओळखल्यामुळेच आपले सर्व चुकते आहे. माझ्यात भगवंत आहे हे दोन प्रकारे पाहता येते. सर्व चेतना त्याच्याकडून मिळते हे एक. दुसरे म्हणजे, ‘ देह ठेवला ’ असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा ठेवणारा कोणी दुसरा असला पाहिजे; म्हणजे देह हा ‘ मी ’ नव्हे. जागृती, स्वप्न, सुषुप्ती यांचा साक्षी कुणीतरी आहे हे खास. ‘ मी कोण ’ हे जाणायला साक्षीरूपाने वागावे. सर्व जगाला मी माझे म्हणतो, पण जो खरा माझा त्याला तसे म्हणत नाही. भगवंत माझ्यात आहे ही जाणीव उत्पन्न करून घ्यावी. अनुमानाने आणि अनुभवाने पाहिले तर भगवंत माझ्यात आहे हे खात्रीने पटेल. वर्षाचा आनंद पाडव्यापासून, आयुष्याचा आनंद वाढदिवसापासून, आणि दिवसाचा आनंद सकाळपासून सुरू होतो, म्हणून भगवंताच्या भक्तीला आपण त्याच्या नामाने सुरुवात करावी; म्हणजे त्यामुळे होणारा आनंद लगेच आपल्याला मिळेल; सुरुवात गोड आणि शेवटही गोडच होईल. आकाश हे जसे सर्वांना सारखे आहे, त्याचप्रमाणे मानवजन्माचे ध्येय हे सर्वांना सारखेच आणि एकच आहे. कोणत्याही जातीतला, धर्मातला किंवा देशातला मनुष्य असो, तो भगवंताच्या प्राप्तीसाठी म्हणजे परमार्थासाठीच जन्माला आला आहे.

आपण भगवंताला शरण गेलो, तर तो आपल्याला हातचा कधी सोडणार नाही.

***



## श्री संत ज्ञानेश्वर
### अभंग व अर्थ

अर्थ:-

जीनरुपीबाळा एकांतात सोहंसुखशयनात असताना त्या सुंदर परमात्म्याचे चरणकमळ पाहयचे असतात. तेथे सुर्य उगवला की फुल फुलले किंवा कमळदळ विकासले तसा अंतरीचा विकास करायचा. ते चरणकमळ भक्त व योगी सतत सेवीत असतात. त्यातुन मिळणाऱ्या ज्ञान मकरंदामुळे ते तृप्त होतात त्यांचे हृदय आनंदाने वोसांडते व ज्ञानडोहात ते वाहात जातात तेथे तो परमानंद त्यांना मिळतो. त्याचे वर्णन करताना पराही खुंटली त्याला पाहुन दृष्टीला ही समाधान झाले. मनाचा अंकुर मनातच मुराला व तो अनुभव कृष्ण होऊनच ठाकला. त्याच्या पायधुळीने सहज तृप्ती होते. चरण, पायधुळ, व भक्त ह्या त्रिवेणीमुळे मला उर्ध्व पाहता येत आहे. ती उध्वरेखा जर सखोलपणे पाहिली तर ती अमृतरेखाच वाटते. म्हणुनच त्या योगाने व संतसंगामुळे जग उध्दरते. ते दोन भाग जरी विस्तारले तरी ते चरणागुष्टापाशीच पोहचतात. पण ते दृष्टीला येणे कठिण आहे तरी मुनीजनांच्या योगे तेथे एकत्व येते. त्या चरणांची नखे ही विशेष आहेत पण त्या काळेपणाच्या वाहणीत ती पुढे निघाल्यासारखी वाटतात. उगमालाच एकत्र झाले की वियोगात वाहले पण ते तर कृष्णरुपातच जडले आहे.

क्रमश: ........



## आरोग्य संजीवनी

## उडीद खाण्याचे आयुर्वेदिक फायदे

ज्योतिर्मय 📖 साहित्य

(मागील अंकावरून)

१) पोटाची समस्या होईल दूर...

जर तुम्हाला पचनासंबंधी समस्या असेल तर केळीच्या पानांचा ज्यूस सेवन करू शकता. या पानांमध्ये पचनक्रिया चांगली करण्यास मदत करणारे गुण असतात. केळीच्या पानांमुळे अपचन आणि डायरिया सारख्या समस्या दूर होण्यास मदत मिळते.

२) बॉडी डिटॉक्स...

केळीच्या पानांच्या रसामध्ये डिटॉक्सीफाईंग गुण असतात. याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर निघण्यास मदत मिळते. तसेच शरीराला ऊर्जा सुद्धा मिळते.

३) ताप कमी होईल...

केळीच्या पानांचा ज्यूस ताप कमी करण्यास खूप फायदेशीर मानला जातो. या पानांमधील फायटो केमिकल्समध्ये अँटी बॅक्टेरियल, अँटी मायक्रोबियल आणि अँटी इन्फ्लामेटरी गुण असतात, यांनी शरीरातील ताप कमी होतो.

४) कॅन्सरवर उपाय...

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित एका रिसर्चनुसार, केळीच्या पानांच्या ज्यूसने कॅन्सर सारखा जीवघेण्या आजाराचा धोका कमी करता येऊ शकतो. याच्या अर्कामध्ये पॉलीफेनॉल आणि फ्लेवोनोइड्सचं प्रमाण भरपूर असतं. या दोन्ही तत्वांमध्ये कॅन्सर सोबत लढण्याचे गुण असतात.

केळीच्या खोडाचा ज्यूसही फायदेशीर...

आयुर्वेद डॉ. डिंपल यांनी केळीच्या खोडाच्या ज्यूस पिण्याचे फायदे, पिण्याची योग्य वेळ सांगितली आहे. केळीच्या खोडाचा ज्यूस प्यायल्याने फॅटी लिव्हर सारखी समस्या दूर होण्यास मदत मिळते. तसेच शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून शरीर आतून स्वच्छ करण्यासही मदत होते. केळीच्या खोडाच्या ज्यूसमधून शरीराला कॅल्शियम, व्हिटॅमिन बी६, पोटॅशिअम, आयर्न आणि मॅग्नेशिअम मिळतं.

केळीच्या खोडाच्या ज्यूसचे फायदे...

१) फॅटी लिव्हर समस्या होईल दूर...

फास्ट फूड, जंक फूड आणि अधिक मद्य सेवनामुळे लिव्हरवर फॅट जमा होतं. पुढे जाऊन लिव्हर सिरोसिस आणि कॅन्सरचा धोकाही वाढतो. अशात केळीच्या खोडामधील अँटी ऑक्सिडेंट कोलेस्ट्रॉल दूर करतं ज्यामुळे लिव्हर वरील फॅटही दूर होतं.

२) बॉडी डिटॉक्स...

आतड्यांची स्वच्छता होत नसल्याने अनेक पोटासंबंधी समस्या होत राहतात. या ज्यूसमुळे लोअर डायजेस्टिव सिस्टीम मधील सगळे ब्लॉकेज दूर होतात. यामुळे तुमचं पचन वाढतं आणि पोटातील चरबीही लगेच कमी होते.

३) कुणी प्यावा हा हेल्दी ज्यूस...?

डॉक्टरांनुसार ज्या लोकांना एनीमिया, हाय कोलेस्ट्रॉल, हाय ब्लड प्रेशरची समस्या असेल तर त्यांनी आवर्जून या ज्यूसचं सेवन करावं. पण किडनीची समस्या असेल तर जरा काळजी घ्यावी.

४) पिण्याची वेळ आणि पद्धत...

डॉ. डिंपल यांच्यानुसार यापासून फायदा मिळवण्यासाठी ७-१० दिवस हा ज्यूस रोज सकाळी रिकाम्या पोटी ३०-१० मिली प्यावा. केळीच्या खोडाच्या ज्यूसने हळूहळू तुमची समस्या दूर होईल.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

◆ वक्ता आणि श्रोते ◆

एक विद्वान वक्ता एका अतिशय महत्वाच्या विषयावर तळमळीने भाषण देत होता. मात्र श्रोत्यांची चुळबुळ सुरु होती. काहीजण इकडे बघ तर काहीजण रस्त्यावर खेळणा-या लहानमुलांकडे बघत होते. तेव्हा श्रोत्यांचे आपल्या व्याख्यानाकडे अवधान खेचून आणण्यासाठी वक्त्याने एक गोष्ट सांगायला सुरुवात केली. कथेची सुरुवात होताच जादूची कांडी फिरल्याप्रमाणे सर्व श्रोते अतिशय सावधपणे गोष्ट ऐकू लागले. वक्ता म्हणाला,'एकदा एक देव, एक पाणसर्प आणि एक चिमणी हे तिघे एकत्रितरित्या प्रवासाला निघाले. चालता चालता त्यांना वाटेत एक नदी लागली. चिमणीने उडून पैलतीर गाठला. पाणसर्प पाण्यातून पोहत पोहत पलीकडे पोहोचला.'' बस्स इतकेच असे सांगून वक्त्याने आपले अर्धवट राहिलेले भाषण चालू केले. श्रोते आता जोरजोराने ओरडू लागले,'' अहो वक्तेमहाशय, देवाचे पुढे काय झाले, त्याने कशी काय नदी पार केली. त्या तिघांचे पुढे काय झाले.'' वक्त्याने शांतपणे उत्तर दिले,''देवच तो; तेव्हा ती नदी पार करून जाण्याचे सामर्थ्य त्याच्याठायी असणे सहाजिकच आहे. तो पाण्यावरूनही चालत गेला असेल किंवा पाण्याला बाजूला सारून जाण्याचीही त्याच्यात होती पण तो अलिकडच्याच तीरावर थांबला.'' श्रोत्यांनी मोठ्या उत्कंठेने विचारले की देवाने असे अलिकडेच थांबण्याचे कारण काय. यावर वक्ता म्हणाला,'' ज्या मूर्खांना महत्वाच्या विषयावरचे असणारे व्याख्यान न आवडता मनोरंजक गोष्टी आवडतात त्या मुर्खांचा विचार करत देव नदीकिनारी बसून आहे. जर तुम्ही या महत्वाच्या विषयाबद्दल माझे विचार ऐकून त्यावर काही उपाय केले व आपल्या राज्याला वाचविले तर देव निश्चित पलीकडच्या तीरावर निघून जाईल'' वक्त्याचा चतुरपणा कामी आला व श्रोत्यांनी पुढील व्याख्यान शांतपणे ऐकून घेतले.

तात्पर्य :- काहीवेळेस आपल्या चांगल्या व देशहिताच्या योजना लोकांच्या गळी उतरविण्यासाठी युक्तीप्रयुक्तीचा वापर करावाच लागतो.

# शिक्षण, सक्षमीकरण आणि संघटनाचा जागर

## जय मल्हार पतसंस्थेचा महिला स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – जय मल्हार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्या वतीने सभासदांचा स्नेहमेळावा, महिला सभासदांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम तसेच नवनिर्वाचित नगरसेवक व मान्यवरांचा सत्कार सोहळा दि. २२ जानेवारी २०२६ रोजी मुकुंदवाडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक, छत्रपती संभाजीनगर येथे अत्यंत उत्साही व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास धनगर समाजातील माता-भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली असून त्यांच्या सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रमात चैतन्यपूर्ण वातावरण अनुभवायला मिळाले.

**मान्यवर लोकप्रतिनिधींची उपस्थिती**

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे धनगर समाजातील नवनिर्वाचित व अनुभवी लोकप्रतिनिधींची उपस्थिती. यामध्ये नवनिर्वाचित नगरसेवक मा. श्री. रामदास हरणे (प्रभाग क्र. ०८), नगरसेविका मा. सौ. सावित्रीताई वाणी (प्रभाग क्र. ०४), मा. सौ. कमलताई नरोटे (प्रभाग क्र. २४) व मा. सौ. वैशालीताई कोरडे (प्रभाग क्र. २५) यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.

**मान्यवर अतिथींचे मार्गदर्शन**

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. सुभाषराव माने (माजी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य),

मा. डॉ. आर. व्ही. म्हस्के (प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, छत्रपती संभाजीनगर), मा. श्रीमती सीमाताई गाडेकर (उपकार्यकारी अभियंता, महापारेषण), मा. श्रीमती ज्योतीताई लादे (पोलीस उपनिरीक्षक मुकुंदवाडी पोलीस स्टेशन), जय मल्हार प्रगती मंडळाचे अध्यक्ष मा. प्रल्हाद बनसोडे,संस्थापक अध्यक्ष मा. शेषराव जोशी,

श्री. रामेश्वर भाऊ कोरडे, श्री. रामचंद्र नरोटे, श्री. भवानराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

**कार्यक्रमाची सुरुवात व रूपरेषा**

कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

कार्यक्रमाची पार्श्वभूमी व उद्देश संस्थेचे संचालक श्री. भानुदास कोरे यांनी मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय मल्हार नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष मा. बंडूराव लोणे हे होते. सूत्रसंचालन श्रीहरी चेपट यांनी केले.

**नवनिर्वाचित नगरसेवक–नगरसेविकांचे मनोगत**

यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका मा. सौ. वैशालीताई कोरडे यांनी ‘‘मला निवडून दिल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार. दिलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही व या पदाला योग्य न्याय देत प्रामाणिकपणे काम करीन,’’ अशी ग्वाही दिली.

नगरसेविका मा. सौ. कमलताई नरोटे यांनीही उपस्थितांचे आभार मानत महिलांना संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आणि प्रामाणिक कामाचे आश्वासन दिले.

**अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर**

मान्यवर वक्त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा इतिहास उलगडत समाजातील महिलांना प्रेरणादायी संदेश दिला.

**‘‘शिक्षण हाच धनगर समाजाचा कायमचा मुक्काम’’ सीमाताई गाडेकर**

प्रमुख पाहुण्या मा. श्रीमती सीमाताई गाडेकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘धनगर समाजाची ओळख केवळ मेंढपाळ अशी नसून हा समाज या मातीचे रक्षण करणारा स्वाभिमानी समाज आहे. प्रत्येक मुला-मुलीच्या हातात लेखणी येईपर्यंत खरा विकास होणार नाही. शिक्षण हाच आपल्या समाजाचा कायमचा मुक्काम असायला हवा त्यांनी पुढे सांगितले की,

‘‘जय मल्हार नागरी सहकारी पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून समाजाची आर्थिक ढाल आहे. महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून व पतसंस्थेच्या सहकार्याने छोटे उद्योग सुरू करून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे.’’

सीमा गाडेकर यांनी आपल्या भाषणातून धनगर समाजातील महिलांना प्रगतीची नवी दिशा दिली. त्या म्हणाल्या की, मेंढरांच्या रक्षणासाठी हातातील काठी महत्त्वाची आहेच, पण उज्ज्वल भविष्यासाठी मुलांच्या हातात लेखणी असणे गरजेचे आहे. ‘‘शिक्षणाशिवाय प्रगती नाही‘‘ हा मंत्र देत त्यांनी प्रत्येक मुलाला शाळेत पाठवण्याचे आवाहन केले.

विशेषतः महिला शक्तीवर बोलताना त्यांनी, ‘‘एकटी स्त्री ठिणगी असते, पण एकत्र आलो तर आपण प्रगतीची मशाल पेटवू शकतो,‘‘ असे ठामपणे सांगितले. या कार्यक्रमामुळे महिलांना संघटित होण्याची आणि स्वावलंबी होण्याची एक नवी उमेद मिळाली आहे.

**महिलांच्या हक्कांवर मार्गदर्शन**

पोलीस अधिकारी मा. श्रीमती ज्योती लादे यांनी महिलांना विशाखा समितीबाबत सखोल माहिती देत अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे व कायद्याची माहिती करून घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास उपस्थित मा. डॉ. सुभाषराव माने (माजी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य) यांनी महिलांवरील अन्याय, स्त्रियांची सुरक्षितता तसेच पाणी व्यवस्थापन या महत्त्वाच्या प्रश्नांवर परखड मत व्यक्त करत नवनिर्वाचित नगरसेवकांना नागरिकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आवाहन केले. समाजात पुढे जाणाऱ्या महिलांबद्दल त्यांनी अभिमान व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

**हळदीकुंकू व तिळगुळ वाटप**

महिला सभासदांसाठी आयोजित हळदीकुंकू कार्यक्रमात महिलांचा सन्मान करून भेटवस्तू देण्यात आल्या. नवनिर्वाचित नगरसेवक-नगरसेविकांच्या हस्ते तिळगुळ वाटप करून कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढवण्यात आली.

कार्यक्रमाचा समारोप संस्थेचे उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. बंडूराव लोणे यांनी केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सभासदांचा विश्वास, सहकार्य व सहभाग यामुळेच संस्था सातत्याने प्रगती करत असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास संचालक श्री. यादवराव गवारे, सौ. शालिनीताई पाटील, श्री. श्रीहरी पाटील, श्री. राजकुमार कुलकर्णी, सौ. विजयाताई होलगडे, सौ. चंचलाबाई बनसोडे, सौ. सुनीता लोणे, सौ. प्रतिमा कोरे, सौ. रत्नमाला चेपट आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे व्यवस्थापक जगन्नाथ सोनाळकर तसेच किरण भंडे व विनोद कावरे यांनी विशेष परिश्रम घेतले. सभासदांमध्ये स्नेह, एकोपा व सहकार्य वाढविणारा हा उपक्रम जय मल्हार नागरी सहकारी पतसंस्थेची सामाजिक बांधिलकी व विश्वासार्हतेची ठळक ओळख ठरला....

# शिस्त : व्यक्तिमत्त्व घडवणारी शिदोरी

**ज्योतिर्मय साहित्य**

खूप वर्षांनंतर मागे वळून पाहिलं, की आयुष्य एखाद्या अखंड प्रवासासारखं वाटू लागतं. थांबे बदलत जातात, रस्ते बदलत जातात, माणसं बदलत जातात पण त्या प्रत्येक थांब्यावर काहीतरी अमूल्य मिळत जातं. माझ्या आयुष्याचा प्रवासही काहीसा असाच. वडिलांची फिरतीची नोकरी. एका गावात मुळं रोवायच्या आतच दुसऱ्या गावाकडे प्रयाण. शाळा बदलायच्या, शिक्षक बदलायचे, मित्र बदलायचे. प्रत्येक नव्या शाळेत पहिल्या दिवशीची ती भीती, अनोळखी चेहरे, आणि मनात प्रश्नांचं काहूर.

एकाच शाळेत दीर्घकाळ राहता येत नाही, याची खंत वाटायची. पण जसजसं आयुष्य पुढे सरकत गेलं, तसतसं उमजत गेलं की ज्या ज्या शाळांमध्ये मी शिकलो, त्या प्रत्येक शाळेने मला घडवलं. कुठे आत्मविश्वास मिळाला, कुठे शिस्तीचे धडे मिळाले, तर कुठे सहनशीलता. या सगळ्या आठवणींत एक आठवण मात्र आजही मनाला स्पर्श करते – जुन्नरमधील शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय आणि चिमटे सर.



मंगेश दौंडकर,
पुणे, मो.- 9890619354

मी पाचवीच्या वर्गात शिकत होतो. आम्हाला मराठी विषयाला चिमटे सर होते. नावाप्रमाणेच शब्दांच्या कडांवर चिमटा लावणारे, अक्षरांच्या वळणावर लक्ष ठेवणारे, शिस्तीचा मापदंड हातात धरून उभे असणारे. त्यांनी वर्गात प्रवेश केला की शब्दही सरळ उभे राहत. त्यांची नजर म्हणजे चालताबोलता आरसा – वहीतल्या चुका दाखवणारी, पण त्याहूनही आधी मनातला आळस हेरणारी.

मराठी तसा माझा आवडीचा विषय आणि तरीही सर्वाधिक जखम देणारा. आमच्या वर्गात माझं अक्षर सुंदर मानलं जायचं. ओळी सरळ, मोकळी जागा नीट, दोष मात्र एकच – र. तो माझा कायमचा शत्रू. कधी जास्त वळलेला, कधी आखूड, कधी ओळीतून खाली उतरलेला. र चुकला की चिमटे सरांचा पाठीवर धपाटा निश्चित. त्या क्षणी डोळ्यांत पाणी, मनात राग, आणि ओठांवर अबोल प्रश्न – ‘‘इतक्या छोट्या अक्षरासाठी एवढी शिक्षा?‘‘

पण आज जेव्हा आयुष्याच्या वळणावर उभा राहून मागे पाहतो, तेव्हा कळतं – तो मार माझ्या अक्षरांवर नव्हता, तो माझ्या स्वभावावर होता. चिमटे सर माझ्यातील ‘‘चालेल‘‘ वृत्ती मोडत होते. ते मला शिकवत होते की सुंदर असणं पुरेसं नसतं; नेमकं असणं गरजेचं असतं.

शाळेतून घरी आलो की वही उघडायचो. एकटाच. शांत. आणि र काढत बसायचो. एकदा नाही दोनदा नाही तब्बल शंभर वेळा. हात दुखायचा, मन थकायचं, पण आत कुठेतरी एक जिद्द जन्म घेत होती. ती जिद्द म्हणजे माझ्या आयुष्याची पहिली शिस्त होती. तेव्हा फारसं समजत नव्हतं, पण माझ्या व्यक्तिमत्त्वाची वीट तिथे रचली जात होती.


चिमटे सर कधी कौतुक करायचे का? फारसं नाही. पण एकदा फक्त एकदाच – माझ्या वहीतला र पाहून त्यांनी मान हलवली होती. शब्द न बोलता दिलेलं ते प्रमाणपत्र आजही मनात कोरलेलं आहे. त्या क्षणी कळलं – शिस्त ही शिक्षा नसते; ती विश्वासाची पायरी असते.

आजच्या काळात शिस्तीवर बोट दाखवलं जातं. मारावर चर्चा होते, पण मारामागचा हेतू विसरला जातो. चिमटे सरांची शिस्त ही निर्दयी नव्हती; ती दूरदृष्टीची होती. त्यांनी आम्हाला सोयीस्कर वर्तमान दिलं नाही, पण सक्षम भविष्य नक्की दिलं. त्यांनी आम्हाला भीती दिली नाही; तर उंची दिली अक्षरांची, विचारांची, आणि आत्मसन्मानाची.

आज माझे शब्द लोक वाचतात, ऐकतात. भाषेवर प्रभुत्व आहे, याचा अभिमान वाटतो. पण त्या अभिमानाच्या मुळाशी आहे तो रोजचा धपाटा, रोजचा सराव, आणि रोज स्वतःला सुधारण्याची सवय.

चिमटे सर, आज तुम्ही कुठेही असाल – तुमच्या त्या कडक शिस्तीला माझा नम्र प्रणाम. तुमची कडक शिस्त माझ्या आयुष्याची शिदोरी ठरली. तुमच्या धपाट्यांनी माझ्या पाठीवर नव्हे, तर आयुष्यावर ठसा उमटवला. आणि माझ्या भाषेतील प्रत्येक शुद्ध शब्द, प्रत्येक नेमकं वाक्य, प्रत्येक समर्थ विचार – हे सगळं केवळ तुमच्यामुळेच.

***




# शिव कांची – कांचिपुरम

**ज्योतिर्मय साहित्य**

३) कैलास नाथर मंदिर

कांचीपुरम येथे असलेले सर्वात जुने शिवमंदिर म्हणजे कैलास नाथ मंदिर.

हे शिवमंदिर पल्लव राजांनी इसवी सन ७०० ते ७२८ यादरम्यान बांधले. या काळी राजा नरसिंह वर्मन दुसरा याने हे मंदिर उभारले. यानंतर त्याचा पुत्र याने त्यात काही भर घातली. हे मंदिर पल्लव द्रविड संस्कृतीचा उत्कृष्ट नमुना आहे. या मंदिरा वरूनच प्रेरणा घेऊन कदाचित बृहदेश्वर मंदिर तंजावर याचे निर्माण झाले असावे. या मंदिरात मुख्य मंदिराच्या भोवती प्रदक्षिणा मार्गावर ५८ छोटी छोटी मंदिरे किंवा देव कोष्टके आहेत. ही छोटी मंदिरे म्हणजे कैलास पर्वता भोवती असलेल्या शिव गणांचे प्रतीक माणल्या जातात. या मंदिरात शिवाची अनेक रूपे आहेत. जसे नटराज, अर्धनारीश्वर, गज संहार मूर्ती, अंधकासुर वध, त्रिपुरांतक, पूर्ण तांडव मूर्ती हेही दिसतात. हे मंदिर वाळूच्या दगडातून बनवलेले आहे. इथे शिव तपस्वी योगी आणि कैलासवासी या रूपात पुजले जातात. गर्भगृहाच्या भिंतीवर शिवांच्या विविध लीला कोरलेल्या आहेत. मंदिरात अजूनही पल्लव काळातील भित्ती चित्रे आहेत. ही सर्वात प्राचीन धार्मिक चित्रकला मानली जाते. मुख्य मंदिराच्या परिक्रमा मार्गात अरुंद,अंधाऱ्या वाटा व गुप्त कोनाडे आहेत. भक्तांचा असा विश्वास आहे की, या मार्गातून परिक्रमा केल्याने अहंकाराचा नाश होतो, आंतरिक साधना घडते तसेच पाप क्षालन ही होते. अशी परिक्रमा करताना आत्मचिंतन घडते. हे अंधारातून प्रकाशाकडे जाणे, ही मोक्ष मार्गाची प्रतिकात्मक यात्रा मांडली जाते.

४) कुमार कोट्टम मंदिर

एकंबरेश्वर मंदिर व कामाक्षी मंदिर यांच्या मध्यावर असलेले कुमार कोट्टम मंदिर आहे. हे मंदिर भगवान मुरुगण म्हणजेच कार्तिकेय यांचे मंदिर आहे. कार्तिकेय यांचीच अन्य नावे म्हणजे मुरुगण षण्मुगम, सुब्रमण्यम अशी आहेत.

या मंदिराची उभारणी सहाव्या ते आठव्या शतकात झाली असावी. नंतर चौल व विजयनगरच्या राजांनी याचा विस्तार केला. हे मंदिर द्रविड शैलीत बांधलेले आहे. यास सुंदर गोपुरम, सभा मंडप व गर्भगृह आहे. येथे मुरुगण म्हणजेच कार्तिकेय हे ब्राह्मण किंवा गुरू रूपात पुजल्या जातात.येथील मूर्ती साधी, तेजस्वी व ध्यानमग्न आहे. हे ज्ञान, वैराग्य व संयमाची प्रतीक मानल्या जाते .

काही परंपरेप्रमाणे मुरुगण हे ब्रम्हदेवाला उपदेश देणारे गुरु आहेत. स्कंदपुराणाची रचना याच मंदिरात झाली अशी येथे दृढ श्रद्धा आहे. त्यामुळे कुमार कोट्टम हे पुराण -ज्ञानाचे केंद्र मानले जाते. तिथे सुब्रमण्यम, वल्ली (म्हणजे मुरुगणाची पत्नी) तसेच देवसेना (ही मुरुगणांची दुसरी पत्नी) यांच्या ही मुर्त्या आहेत. यातील वल्ली ही इच्छा शक्तीचे प्रतीक आहे, तर देवसेना (ही इंद्राची कन्या) आणि ती क्रियाशक्तीचे प्रतीक मानल्या जातात.

आख्यायिका अशी आहे की ब्रह्मदेवाला प्रणव म्हणजेच ओमकाराचा खरा अर्थ माहित नव्हता. भगवान मुरुगणांनी त्यांना कारागृहात ठेवून ओम चा गुढ अर्थ सांगितला. म्हणून मुरुगण इथे ब्रह्म शास्ता किंवा ज्ञान गुरू म्हणून ओळखले जातात. हे मुरुगणांच्या भक्तीचे प्रमुख केंद्र मानल्या जाते.

ज्ञान वाणी स्मरणशक्ती व अध्यात्मातील प्रगतीसाठी येथे प्रार्थना करतात.

जय भोला भंडारी!
उदे इ अंबे उदे !
जय गणेश,जय मुरुगन!

***

ज्योतिर्मय

Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

मार्केट कॅप म्हणजे काय?
म्युच्युअल फंडमधील मार्केट कॅपिटलीझशन (मार्केट कॅप) म्हणजे काय?
म्युच्युअल फंड कोणत्या आकाराच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करतो, हे मार्केट कॅप सांगते. यावरून त्या फंडाचा धोका (रिस्क), परतावा (रिटर्न) आणि स्थिरता समजते.
मार्केट कॅपिटलीझशन म्हणजे काय?
मार्केट कॅप = शेअरची किंमत × एकूण उपलब्ध शेअर्स
या मूल्यावरून कंपन्या (आणि त्यात गुंतवणूक करणारे म्युच्युअल फंड) खालील तीन गटांत विभागल्या जातात:
1 लार्ज - कॅप फंड. कंपन्यांचा क्रमांक: मार्केट कॅपनुसार पहिल्या 100 कंपन्या. वैशिष्ट्ये: स्थिर, मजबूत आणि आघाडीच्या कंपन्या. धोका: कमी ते मध्यम परतावा: स्थिर, कमी चढउतार
▪ योग्य कोणासाठी : सुरक्षिततेला प्राधान्य देणारे, दीर्घकालीन गुंतवणूकदार
उदा.: रिलायन्स, TCS, HDFC बँक
2 Mid-Cap फंड
कंपन्यांचा क्रमांक: 101 ते 250
वैशिष्ट्ये: वाढीच्या टप्प्यातील कंपन्या
धोका: मध्यम ते जास्त
क्रमश:......

आम्ही तुमचे पुस्तक प्रकाशित करू !
प्रत्येक लेखकाचं एकच स्वप्न असते ते म्हणजे माझ्या कवितांचे, लेखांचे, कथांचे, कादंबरीचे पुस्तकात रूपांतर व्हावे व ते जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचावे, मग हे स्वप्न आम्ही पूर्ण करू.
उत्कृष्ट छपाई, साजेसे मुखपृष्ठ अगदी कमी वेळेत व अगदी बिनचूक.
मग वाट कसली बघता तुमचे स्वप्न पूर्ण करा ज्योतिर्मय प्रकाशन सोबत.
लगेच कामाला लागा व आम्हाला खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करा.
ज्योतिर्मय प्रकाशन
▪ पुणे ▪ छ. संभाजीनगर
संपर्क : 7743 81 8559
ज्योतिर्मय प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ


ऑनलाईन औषधोपचार


आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# विदर्भ साहित्य संघाच्या हितासाठी ना.नितीन गडकरींना पत्र

**ज्योतिर्मय साहित्य**

नागपूर : विदर्भ साहित्य संघाच्या सुरू असलेल्या पंचवार्षिक निवडणुकीच्या संदर्भात नितीन गडकरी यांच्या नावाचा गैरवापर होत असल्याचे व त्यांनी एका अवाङ्मयीन, अमराठी राजकीय नेतृत्व असलेल्या व विदर्भ साहित्य संघात कधीही सक्रिय नसलेल्या सदस्याला सरळ संस्थेच्या अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सांगितले असा समज तथाकथित उमेदवार व त्यांचे समर्थक यांच्याच वतीने पसरविण्यात येत आहे, त्यायोगे इतर उमेदवारांवर दडपण आणले जात आहे व स्वतः नितीन गडकरी यांच्या जनमानसात असलेल्या स्थानालाही त्यामुळे इजा पोहचवली जाते आहे हे विदर्भ साहित्य संघाचे सुमारे तीस वर्षे उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे पूर्वाध्यक्ष राहिलेले डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी नितीन गडकरी यांना पत्र लिहून निदर्शनास आणून दिले आहे.

अशा प्रकारे त्यांच्या नावाचा वापर होणे व तो तसाच होऊ देणे हे माझ्यासारख्या या संस्थेत सुमारे तीस वर्ष उपाध्यक्ष राहिलेल्या, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा अध्यक्ष राहिलेल्या व आपण कधीच या संस्थेत तोवर असा हस्तक्षेप केल्याचा अनुभव नसलेल्यासाठी फारच क्लेशदायक आहे असे डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी पत्रात म्हटले आहे.



विदर्भ साहित्य संघाच्या कार्यासाठी आम्हाला निरपेक्ष भावनेनेच यथोचित सहकार्य नेहमीच तुम्ही केल्याचा आमचा अनुभव असल्याने असे काही ऐकले असले तरी आम्हाला ते विश्वसनीय वाटत नाही. म्हणूनच थेट आपणास संपर्क साधून यात कितपत तथ्य आहे याची खात्री करून घेण्यासाठी कृपया हे पत्र लिहित आहे असे डॉ जोशी यांनी म्हटले आहे.

यात खरोखरच तथ्य असेल तर मात्र ते जनमानसात सुस्थापित आपल्या प्रतिमेला देखील बाधक ठरणारे आहे. त्यामुळे तसे काही असल्यास कृपया आपण त्याचा विदर्भ साहित्य संघ या शंभर वर्षांची वाङ्मयीन परंपरा असलेल्या संस्थेच्या हितासाठी पुनर्विचार करावा व या संस्थेच्या अध्यक्षपदी वाङ्मयीन प्रतिष्ठा, प्रतिमा सुस्थापित असणारी, दिशादर्शक व्यक्तिमत्त्व असणारीच वाङ्मयीन व्यक्तीच असावी असा आग्रह धरावा अशी विनंती देखील डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी नितीन गडकरी यांना केली आहे.

आपल्या नावाचा असा वापर होण्यावर एका प्रमुख दैनिकाच्या संपादकांच्या स्तंभ लेखनातून उमटलेली तीव्र संतापजनक प्रतिक्रिया तसेच दुसऱ्या एका दैनिकातून देखील उमटलेली तशीच प्रतिक्रिया या दोन्ही तद्वतच एका ऑनलाईन पोर्टल वरील वृत्तपत्रातून उमटलेली तीव्र व संतापजनक प्रतिक्रिया हे सारे डॉ जोशी यांनी नितीन गडकरी यांना पाठवले असून ते त्यांनी थोडी सवड काढून गांभीर्याने स्वतः बघावे अशी विनंती केली आहे.

विदर्भ साहित्य संघात कधीही सक्रिय नसणाऱ्या या अवाङ्मयीन व अमराठी व्यावसायिक राजकीय नेतृत्वाने शंभर वर्षे वयाच्या या साहित्य संस्थेच्या सरळ अध्यक्षपदाचीच अभिलाषा बाळगण्यावर सदस्यांची व माध्यमातून तीव्र संतापजनक प्रतिक्रिया उमटली असून अशा व्यक्तिला विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी बघणे सदस्यांना मुळीच नको आहे. त्यामुळे लोकांच्या या भावनेचा आदर करून त्यांनी खरे तर या उमेदवाराने तातडीने आपली उमेदवारी मागे घेणे अथवा नितीन गडकरी यांनी ते म्हणतात तसे त्यांना उमेदवारी अर्ज भरण्यास

* विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीतील एका अवाङ्मयीन, अमराठी उमेदवाराकडून मतदारावर दडपण आणण्यासाठी चक्क नितीन गडकरींच्याच नावाचा गैरवापर क्लेशदायक
* नितीन गडकरींनी संबंधित उमेदवारास समज द्यावी व हा गैरसमज जाहीरपणे दूर सारावा
* डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे नितीन गडकरींना पत्र

सांगितले असल्यास आता मात्र तो त्वरीत मागे घेण्यास नितीन गडकरी यांनी सांगणे हेच संस्थेच्या व त्या संबंधित व्यक्तिच्याही अन्य क्षेत्रातील आजवरची प्रतिमा यथायोग्यरित्या सुरक्षित राखण्यासाठी आवश्यक आहे ही त्यांच्या हितचिंतकांचीही भावना आहे. ती लाथाडून ते आपली उमेदवारी कायमच ठेवणार असतील तर त्यांना तसे करायला सांगणारे नितीन गडकरी आहेत असे जे तेच सांगताहेत, त्या नितीन गडकरी यांच्याही जनमानसातील प्रतिमेला बाधा आणणारे आहे. त्यामुळे ना.नितीन गडकरींनी तरी त्या उमेदवाराला तंबी देत उमेदवारी अर्ज नितीन गडकरी यांनी भरायला सांगितलेला नाही हे जाहीर करावे अशी विनंती डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी त्यांच्या पत्रात केली आहे. अन्यथा लोकांचा रोष नितीन गडकरी यांच्याकडेही वळू शकतो, असे होऊ नये यासाठीही आपण एक समंजस, विवेकी नेतृत्व म्हणून ज्ञात असल्याने हे यथाशीघ्र करावे व आपल्या बद्दलचा आमचा आदर द्विगुणित करावा अशी अपेक्षा डॉ जोशी यांनी पत्रात व्यक्त केली आहे.


# ऑनलाईन संस्कृत परिषद व शोध निबंध स्पर्धेचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : अभिज्ञान, पुणे यांच्या वतीने ऑनलाईन संस्कृत परिषद आणि शोध निबंध स्पर्धा चे आयोजन करण्यात आले आहे. ही एकदिवसीय परिषद २२ फेब्रुवारी २०२६, रविवार रोजी झूम या ऑनलाईन माध्यमातून संपन्न होणार आहे.

या परिषदेत संस्कृत विषयाशी संबंधित संशोधन, अध्ययन व चिंतनाला व्यासपीठ मिळणार असून संस्कृत शिक्षक, प्राध्यापक, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच संस्कृतप्रेमी जनसामान्य यांना सहभागी होता येणार आहे. विशेष म्हणजे, सर्व सहभागी संशोधकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असून संशोधन निबंध सादर करणाऱ्यांना मेडल्सही प्रदान करण्यात येणार आहेत.

या परिषदेत मराठी, हिंदी, संस्कृत तसेच इंग्लिश या चार भाषांमध्ये शोध निबंध सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संशोधन निबंधासाठी खालील दहा विषय निश्चित करण्यात आले आहेत संस्कृत साहित्य (काव्य, नाट्ये), संस्कृत व्याकरण, शास्त्रीय नृत्य, भारतीय




नाट्यशास्त्र, भारतीय संगीत, प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती, भारतीय तत्त्वज्ञान, पुराणे व महाकाव्ये, वेदउपनिषदवेदांगे तसेच ''संस्कृत अभ्यासाने माझ्यात घडविलेले परिवर्तन''.

शोध निबंधाची शब्दमर्यादा १००० शब्द इतकी असून निबंध मुद्रित (टाइप केलेला) असणे आवश्यक आहे. मराठी, हिंदी व संस्कृत निबंध युनिकोड फॉन्टमध्ये (आकार १४) तर इंग्लिश निबंध टाइम्स न्यू रोमन फॉन्टमध्ये (आकार १२) सादर करावेत. निबंधावर लेखकाचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.

या परिषदेचे नोंदणी शुल्क केवळ ३०० रुपये इतके असून ते फोनेपे/गूगल पे द्वारे ७२४९१२२४२८ या क्रमांकावर पाठवावे लागेल. शुल्क भरल्याचा स्क्रीनशॉट तसेच शोध निबंधाची वर्ड फाईल व्हाट्सअँप द्वारे याच क्रमांकावर पाठवणे आवश्यक आहे.

महत्त्वाचे दिनांक : शुल्क भरून नोंदणी व शोध निबंध सादर करण्याचा अंतिम दिनांक २० फेब्रुवारी २०२६ शोध निबंध सादरीकरण (झूम) २२ फेब्रुवारी २०२६ (रविवार) डिजिटल प्रमाणपत्र वितरण २८ फेब्रुवारी २०२६ यशस्वी संशोधकांना मेडल्स पाठविण्याचा दिनांक ३ मार्च २०२६

अधिक माहितीसाठी व सहभागासाठी इच्छुकांनी व्हाट्सअँप संपर्क : ७२४९१२२४२८ / ९८५००७४४१८ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात वसंत पंचमी व नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

**ज्योतिर्मय साहित्य**

कामठी येथील सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ येथे वसंत पंचमी आणि सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉक्टर सुधीर अग्रवाल, पर्यवेक्षक प्रा विश्वनाथ वंजारी डॉ नीता वानखेडे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून. प्रा जाधवानी उपस्थित होत्या.याप्रसंगी प्रा जाधवानी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तर प्रा डॉ सुधीर अग्रवाल यांनी आपल्या भाषणातून माता सरस्वती, संत तुकाराम सुभाषचंद्र बोस आणि हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती असल्याचे प्रतिपादन करून

वसंत पंचमी ही शिशिर ऋतूमध्ये येणारी माघ शुद्ध पंचमी होय. वसंत पंचमीलाच श्रीपंचमी किंवा ज्ञानपंचमी म्हणतात. वसंत ऋतूला ऋतूंचा राजा असे मानले जाते. त्याचे स्वागत करण्याचा हा विशेष दिवस आहे,असे सांगितले. तसेच

वसंत पंचमी हा जानेवारी किंवा फेब्रुवारीमध्ये साजरा केला जाणारा एक उत्साही हिंदू सण आहे, जो वसंत ऋतूची सुरुवात दर्शवितो. हा सण ज्ञान, बुद्धी आणि कलांची देवी सरस्वती यांना समर्पित आहे. भारतात, वसंत पंचमी विशेषतः शाळा आणि महाविद्यालयांमध्ये साजरी केली जाते.. हा दिवस ज्ञान आणि शिक्षणाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो,असे प्रतिपादन केले.यापसंगी सुभाष चंद्र बोस यांचे देखील त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा किरण पुडके यांनी तर आभार प्रदर्शन प्रा श्रीधर नागपुरे यांनी केले

# डॉ. होमी जहांगीर भाभा

**ज्योतिर्मय साहित्य**

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत



आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!


**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# जे व्हायचे ते होणारच आहे मग उद्याची चिंता कशाला?

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्या मानवी जीवन प्रचंड धावपळीचे झाले आहे. माणूस वर्तमानापेक्षा उद्याची चिंता करत असतो.उद्याचा दिवस आज अजून आलाच नाही तर ती चिंता, काळजी कशाला? आणि उद्या काय होणार आहे? काय घटना घडणार आहे? याचे शंभर टक्के अचूक भविष्य कुणीही सांगू शकत नाही, त्यामुळे उद्याची चिंता करणे केवळ व्यर्थ आहे.

उलट उद्याची चिंता केल्याने मानसिक ताण वाढतो, मानसिक ताणाने शरीर नकारात्मक काम करते आणि शरीराने नकारात्मक काम सुरू केले की मग मागे लागतो तो दवाखाना आणि दवाखाना मागे लागणे म्हणजे पैसा आलाच.




असे करत करत माणूस या नकारात्मक चक्रात गुरफटत जातो, आणि त्यात एखादी मोठी व्याधी मागे लागली मग सुरू होते ती धावपळ काळजी, म्हणजे एक चिंता दुसऱ्या चिंतेकडे नेते आणि हे चक्र मग मानवी मनाला चक्रावून सोडतं आणि मग कुणी विचारले काय चाललेय? मी चिंतेत आहे, जेवण झाले का नाही? नाही मला भूक लागत नाही मी, चिंतेत आहे, कुणी विचारले झोप होती की नाही रोज व्यवस्थित? नाही मी चिंतेत आहे

म्हणजे उठता, बसता, चालता, बोलता, झोपता चिंता, चिंता, चिंता, चिंता आणि फक्त चिंता . आणि मग हीच चिंता हळूहळू चितेकडे प्रवास सुरू करते. रमण महर्षी नेहमी म्हणत असत, जे व्हायचे ते होणारच मग चिंता कशाला?

माझ्या मुलाचे, मुलीचे भविष्य कसे असेल? याची चिंता आजच का? या बद्दल अभ्यास आणि विचारपूर्वक निर्णय घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे हे ठीक पण ते असेच झाले पाहिजेत, तसेच झाले पाहिजेत हा हट्ट त्रासदायक होऊ शकतो. आपले जीवन हे उद्याची चिंता करण्याकरता नाहीये तर आजचा वर्तमानातील क्षण आनंदाने जगण्याकरता आहे.

नित्य सकाळी झाडावरील कळ्या फुलून त्याचे सुंदर फुलांत परिवर्तन होते. त्या फुलांना माहित असतं, संध्याकाळी आपल्याला कोमेजून जायचे आहे आणि मग निस्तेज होऊन मातीत मिसळून जायचे आहे म्हणून ती फुले काही सकाळी टवटवीत फ ुलण्याचे सोडत नाहीत, पण माणूस नावाचा सर्वात हुशार प्राणी आपलेच जीवन चिंता, काळजी करून अधोगतीकडे नेत असतो. म्हणून उद्याची चिंता, काळजी करणे आणि त्यामुळे निर्माण होणारे भय, मानसिक आरोग्य व शारिरीक आरोग्य बिघडवण्यास आपणच जबाबदार असतो.

हे सर्व टाळायचे असेल तर उद्याची चिंता कशाला?

माझी एक स्वलिखित कविता आहे,

ती लिहून येथे थांबतो मात्र जे उद्याची चिंता करतात त्यांनी नक्की चिंता करणे थांबवले पाहिजे बरं का.

या साठीच हा सारा खटाटोप.

चिंता
******
मनी माणसा व्यर्थ
चिंता नको रे
उगी माणसा जीवनी
गुंता नको रे
तुझ्या हाती काय ते
पहा विचार मनाला
कर वाटप प्रेमाचे
अर्थ लागू दे जगण्याला
एकदाच हे जीवन आहे
कर उत्सव तू जगण्याचा
नित्य बघ घटना आसपास
कुठे भरवसा तो क्षणाचा
उशीर खूप झालाय आता
नको आणखी वाट पाहू
उठ, बोल माणसं जोड
झटक आळस, नको शांत राहू.
**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559